# ध्यानधारणा
आणि
# भक्ती रहस्य अर्थात भक्तीचे वेड



## ॥ श्री पूर्ण परब्रम्ह ॥
## कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान

।। ॐ ।।

।। श्री सद्‌गुरु दुर्वास दत्त प्रसन्न ।।

## प्रस्तावना :

भक्त जनांचिया घ्यावया कैवार । धावे मी ईश्वर युगायुगी ॥१॥
दत्त दुर्वासाने झालो मी साकार । आता अवतार कलंकी हा ॥२॥
वैजनाथ रुपे बारे ज्ञान ज्योत । झालो भगवंत कलियुगी ॥३॥
वैजनाथ म्हणे ज्ञानी भक्तविण । नोहे मी सगुण लाभे कुणा ॥४॥
(कलंकी देव कृष्ण पाठ - २८)

मूळारंभी श्री गजानन व ज्ञानमाता सरस्वती चरणी वंदन करुन हे प्रास्ताविक लिहीत आहे. साधू संत व सती - साध्वींच्या ह्या अध्यात्मिक भारत भूमित अनेक महापुरुषांचा जन्म झाला व त्यांनी ह्या मानवजातीला अमोलिक असे अध्यात्मिक ज्ञानभांडार प्रदान केले.

नरदेह हा सर्वात उत्तम आहे. ह्या देहातून मानवाला आपल्या षडविकारांवर नियंत्रण आणता येते. आपली स्वत:ची ओळख होऊन 'मी' चा प्रश्न सोडविता येतो. मानव जन्माच्या चार अवस्था आहेत त्या म्हणजे (१) बध्द (२) मुमुक्षु (३) साधक (४) सिध्द होत. ह्या चार अवस्थांमध्ये अध्यात्मिक आठ भूमिका मोडतात त्या पुढीलप्रमाणे -

१) **बध्द :-** सर्व सामान्य मानवाची पशुवत अवस्था फक्त प्रापंचिक ज्ञान

२) **मुमुक्षु १ :-** पंचवीस टक्के ईश्वराविषयी ज्ञान, भक्ती व पंचाहत्तर टक्के लक्ष संसाराकडे केंद्रीत

३) **मुमुक्षु २ :-** पन्नास टक्के लक्ष ईश्वरी भक्तीकडे, पन्नास टक्के प्रपंचाकडे

४) **सत्पुरुष (साधक योगी) :-** परमार्थातील ह्या भूमिकेत रिध्दी-सिध्दी प्राप्त होतात. ध्यान समाधीयोग साधला जातो. काही साधक ह्याच रिध्दी - सिध्दीच्या आकर्षणामुळे सदर अवस्थेत अडकून पडतात.

५) **संत :-** ह्या भूमिकेत खऱ्या ईश्वरी साक्षात्काराला सुरुवात होऊन स्वानंद प्रगटतो. अभंग, प्रासादिक वाणी बाहेर पडते.
उदा. संत रामदास स्वामी, तुकाराम महाराज, संत एकनाथ, संत नामदेव, साध्वी मिराबाई इत्यादी.

६) **सद्‌गुरु :-** ह्या भूमिकेत ब्रह्मनाद ध्वनी कानी प्रगटून सत् चित आनंद प्रगट होतो. चित-प्रकाश दर्शन होऊन सिध्दावस्था प्राप्त झाल्याने दुसऱ्याचा

गुरु होऊन नामस्मरण इत्यादि मार्गदर्शन करण्याचा अधिकार प्राप्त होतो. उदा :- रामकृष्ण परमहंस, अक्कलकोट स्वामी, साईबाबा, गजानन महाराज, नित्यानंद स्वामी इत्यादी

७) **ब्रह्मवेत्ता :** या भूमिकेत ब्रह्मानंद प्रगट होतो. ब्रह्मसुत्राचा अधिकारी पुरुष. ब्रह्मांड चालवू शकतो. प्रति ईश्वर अशी सर्वोच्च अवस्था मानवाला प्राप्त होऊ शकते.

उदा :- श्री गुरुदत्त, याज्ञवल्क्य, शुकदेव, कपिल मुनी, नारद मुनी इत्यादी

८) **परब्रह्म :-** मूळ ब्रह्म माया ह्या अवस्थेत राहतात. परमानंद अवस्था भोगून अभास अशी स्थिती.

उदा. :- श्रीराम, श्रीकृष्ण, पर्शुराम, ज्ञानेश्वर, आदिशक्ती सीता, पार्वती इत्यादी शीव व शक्ती स्वरुपे.

वरील भूमिकांचे ज्या परमपुरुषाने वर्णन केले आहे ते आहेत ह्या कलियुगातील परब्रह्म अवस्थेतील महात्मे "कलंकी ईश्वर वैजनाथ भगवान" ! ह्या परमपुरुषाचा रहिवास महाराष्ट्र भूमित सन १९१६ ते १९८७ च्या दरम्यान झाला. त्यांच्या प्रसिध्दी पराड्मुख भूमिकेमुळे ते बहुतांशी मानवाजातीला अज्ञातच राहिले. फारच थोड्या सज्जनांनी त्यांना जाणले व त्यांच्या कार्यास मदत करण्याचा प्रयत्न केला. सध्या संत कलंकिनी बेबीनाथ माया यांच्या मार्गदर्शनाखाली काही भक्तगण त्यांच्या कार्याचा प्रसार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

परंतु हल्लीचा कलियुगाचा काळ म्हणजे आधुनिक विज्ञानाचा. अण्वस्त्रांच्या अघोरी शोधांचा, फॅशन युगाचा व भोगवादी अप्पलपोटी मानवांचा आहे. अशा ह्या घोर कलीयुगात खऱ्या विभुतींना विचारतो तरी कोण? चार्वाकवादी ह्या मानवाला कोणाला आत्मसाक्षात्कार हवाय बरे? इथे फक्त ईश्वर साध्य नव्हे तर साधन म्हणून पाहण्याचा बहुतांशी उपासकांचा कल. जिंदगी आहे तो पर्यंत खा - प्या व मजा करा. कोणास ठाऊक मेल्यावर काय होते? अशीच विचारधारा ह्या कलीत जगभर दिसून येते. मात्र भारतीय संस्कृतीचा वारसा असलेल्या साधू संतानी ह्या घोर कलीतही मानवांना ज्ञानोपदेश देऊन वर काढण्याचा प्रयत्न केला व करत आहेत. त्यामुळे थोडीफार संस्कृती टिकून आहे. अन्यथा ह्या कोलाहलात जगाची अवस्था काय झाली असती व होईल

हे ईश्वरच जाणे.

खरे पाहता स्त्री आणि पुरुष ह्याच मानवाच्या दोन जाती. व माणुसकी, समानता व विश्वबंधुत्व भाव हीच मूळ ईश्वराची शिकवण ! परंतु मानवाने आपल्या चालिरीती, रुढी परंपरा वेगवेगळ्या बनवून धर्माला आपापल्या मतांप्रमाणे नावे दिली. जसे हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौध्द, पारशी, जैन इत्यादी. ईश्वराने प्रत्येक धर्मात त्या त्या लोकांच्या उन्नतीकरीता प्रेषित पाठविले. महंमद पैगंबर, गौतम बुध्द, वर्धमान महावीर, झरतृष्ट, गुरु नानक इत्यादी, ईश्वर प्रेषितांनी आपणा सर्वांना मानवतावादाची शिकवण दिली, परंतु मानवांनी आपल्या स्वार्थ बुध्दीने धर्म भेद, पंथभेद वाढवून अखंड मानवजातीत तेढ निर्माण केली व त्यामुळेच धर्माचे खरे मर्म विसरले गेले, अधर्म वाढून धर्माला ग्लानी आली. ती काढण्याकरिताच ह्या मानवेतचा कलंक धुवून काढण्यासाठी मूळ ईश्वराने ह्या घोर कलीत श्री संत रामदास स्वामी, यांच्या "अनाथा दीनाकारणे जन्मताहे । कलंकी पुढे देव होणार आहे". ह्या उक्तीनुसार वैजनाथ नामे कलंकी अवतार धारण केला व ह्या मानवजातीपुढे विश्वधर्माची शिकवण देणारे तत्वज्ञान प्रगट करुन अखंड मानवजातीसाठी सत्यज्ञानाचे ज्ञानभांडार निर्माण करुन ठेवले आहे. हे सर्वांच्या दृष्टीने खरोखरच महत्‌भाग्य आहे. हा कलंकी परब्रह्माचा ह्या चौकडीतील शेवटचा अवतार ! त्यांच्या ब्रह्मनाद ध्वनीतून बाहेर पडलेले दोन ग्रंथ ह्या पुस्तिकेत आम्ही प्रकाशित करत आहोत ते म्हणजे 'ध्यान धारणा' व 'भक्तीरहस्य' अर्थात भक्तीचे वेड.

'ध्यानधारणा' ही नानाविध तऱ्हेने करण्याचा मनुष्य प्रयत्न करतो. परंतु कलंकी वैजनाथ भगवंतानी ह्या ग्रंथात मूळ ईश्वराकडे अवधान ठेवून ध्यानधारणा कशी साधायची हे स्पष्टपणे सांगितले आहे. प्रत्येकजण कुठले ना कुठले ध्यान करीत असतो. जसे कुणाला पैशाचे, तर कुणाला स्त्रीचे, तर कुणाला सत्तेचे, तर कुणाला पैशाचे, तर कुणाला स्त्रीचे, तर कुणाला सत्तेचे, तर कुणाला आणखी कशाचे ध्यान लागलेले असते. परंतु आत्म्याचे ध्यान लागण्यासाठी काय करावे व जनता जनार्दनातला ईश्वर ओळखून आपल्या सद्‌गुरुकृपेने आत्म्याचे ध्यान कसे साधून घ्यावे ह्याचे प्रस्तुत १९५ वचनांच्या ह्या छोट्याशा ग्रंथात विवेचन केले आहे. गद्यमय मराठी भाषेतील हा ग्रंथ मननीय व आचरणीय असाच आहे. तो परब्रह्माचा प्रसाद आपल्या जीवनाचे कृतार्थ करणारा आहे.

म्हणून वाचक ह्या ज्ञानसागरात डुंबून त्याचा लाभ निश्चित घेतील अशी सदिच्छा आहे.

दूसरा ग्रंथ म्हणजे 'भक्तीरहस्य' अर्थात भक्तीचे वेड' ह्या ग्रंथात कलंकी भगवंतांनी भक्तीचे मूळ मर्म विशद करुन दांभिकपणाला तिलांजली देऊन खरी ईश्वराची भक्ती कशी करावी हे विशद केले आहे. ह्या ग्रंथातून आत्मा परात्म्याची जाणिव करुन घेऊन मूळ आत्मदेव परब्रह्माला कसे आळवावे हे सांगितले आहे व खोट्या व काल्पनिक देवाची उपासना करुन आपण काय साधणार? असा प्रश्न आपणापुढे उभा करुन प्रपंचातून परमार्थ कसा साधावा याचीच जणू गुरुकिल्ली प्रस्तुत १५१ वचनांच्या ग्रंथात कथन केली आहे. ग्रंथ प्रासादिक असल्याने कुठेही संशयाला व तर्काला वाव नाही व मूळ ईश्वराला काय प्रिय आहे हे त्यांनीच सांगितल्याने तुम्ही आम्ही मानवांनी वेगळा हट्ट का बरे करुन स्वत:ला फसवावे? तरी त्याप्रमाणे आचरण करुन आपले जीवन कृतार्थ करावे ही विनंती.

प्रस्तुत ग्रंथ प्रकाशनासाठी मुंबईकडील काही कलंकी भक्तांनी श्रमदान व धनदान अर्पण केल्याने ह्या ग्रंथाचे प्रकाशन कार्य सुलभ व लवकर होत आहे. तसेच त्यासाठी पेणचे मुद्रक श्री. विनायक गोखले यांचे अमोलिक सहकार्य लाभल्यानेच हा ग्रंथ अल्पशा वेळेत व व्यवस्थित प्रकाशित होऊ शकला. तरी ह्या ज्ञानभांडाराच्या अमृत कणाचे आपण सेवन करुन आपले जीवन कृतार्थ करुन घ्यालच अशीच सद्‌गुरु कलंकी वैजनाथ माऊली चरणी प्रार्थना !

आपले नम्र

**कलंकी देव भक्त कार्यकारी मंडळ,**

**संगमनेर, जि. अहमदनगर**

**जय जय दत्तराज माऊली ।**

**जय जय वैजनाथ माऊली ।।**

**प्रथमावृत्ती** : मार्गशीर्ष पौर्णिमा 'दत्त जयंती', शके १९२३

शनिवार दिनांक २९ डिसेंबर २००१

© सर्व हक्क कलंकी देव भक्त कार्यकारी मंडळाच्या स्वाधीन.

।। श्री पूर्ण परब्रह्म ।।

# कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान यांचा अल्प परिचय

विश्वव्यापी बंधू - भगिनींनो ! आम्हाला कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, संत-साधू जनांच्या रक्षणासाठी, असुरी वृत्तीच्या दुष्ट मनोवृत्ती नष्ट करण्यासाठी, सद्धर्म रक्षणासाठी, सत् प्रवृत्तीचा उगम होण्यासाठी, युगायुगात परमेश्वराने कच्छ, मच्छ, रामकृष्णादि अवतार घेतले. त्यात ह्या घोर कली युगात महासती अनुसया अत्री यांचे पोटी अयोनी संभव परम पुजनीय, पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार वैजनाथ नामे श्रावण शुध्द १ प्रतिपदा सोमवार सुर्योदयावेळी सन १९१६ रोजी महाराष्ट्रात नगर जिल्हा संगमनेर शहरात, साळीवाडा भागात गणपतसिंह सरदारसिंह परदेशी यांच्या वाड्यात, भूमंडळावर सगुण साकार झाले.

श्री परम पुजनीय कलंकी देवाचे बालपण पंचवटी नाशिक येथे गेले. नंतर सन १९३१ साली पुण्यात वास्तव्य झाले. बराचसा काळ कलंकी देव देहभान स्थितीत नव्हते. पुढे सन १९३६ साली त्रैलोक्याधिपती ब्रह्मवेत्ते त्रैमुर्ती दत्त भगवान यांनी पुण्यात शुक्रवार पेठ गाडीखाना येथे मानवी स्वरुपात येऊन विजयादशमी (दसरा) या दिवशी अनुग्रह देऊन चिरंजीव हो ! म्हणून आशीर्वाद दिला. नंतर वृध्द माता, पिता, चुलता चुलतीसह श्री कलंकी वैजनाथ देव तिर्थ यात्रेस बाहेर पडले. वाई, सातारा इ. महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी फिरुन सन १९४९ साली कलंकी देव संगमनेरला परत आले.

श्री कलंकी भगवंताच्या ब्राह्मी स्थितीतून अद्वितीय, अफाट आणि अमोलिक असे हस्तलिखित ज्ञानभांडार बाहेर पडले. त्यात सतरा अठरा लहान मोठे ग्रंथ, लाखो अभंग, पदे, दोहरे, श्लोक इत्यादी सर्व प्रकारचे सामाजिक, अध्यात्मिक, भक्तिपर, चालु परिस्थितीवर आधारीत असे हे हस्तलिखित

ज्ञान भांडार आहे. भक्तगण या दिव्य ज्ञानांमृताचा लाभ घेत असतात. परमार्थात मुरलेल्या ज्ञानी, समंजसानी व इत्यादिनी या दिव्य ज्ञानाचा लाभ घेऊन कृतार्थ होऊन जावे आणि अवतार कार्याचे मर्म जाणावे.

सन १९६३ साली श्री कलंकी देवांची कुंडलीनी जागृत होऊन तिची पूर्णता सन १९६४ साली झाली. बौध्द अवतार ज्ञानेश्वर माऊलीने त्या काळातील संस्कृत भाषेतील ज्ञान प्राकृतात निर्माण करुन भागवत धर्माची स्थापना केली. सर्व संताना सांगितले की, "माझे अर्धवट राहिलेले कार्य पुढे मी कलंकी वैजनाथ रुपाने पूर्ण करीन." विश्वधर्माची स्थापना होईल व धर्माचे मुळ जे समता, स्वातंत्र्य बंधूभाव निर्माण होऊन भूतदया वाढेल. आजपर्यंत ईश्वराचे नऊ अवतार झाले. श्री पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान, हे दहावा अवतार होत त्यांचे महानिर्वाण आषाढ शु॥ १० सोमवार दिनांक ६ जुलै १९८७ साली झाले.

**टिप :** कलंकी देवांचे वायुरुप स्थितीने साक्षात्कार लिला घटना घडत राहतीलच. सवे गोरक्ष, हनुमंत, दत्त हे राहतील. भक्तजनांना त्यांचे दृष्टांत साक्षत्कार होत असतातच.

आपले

**कलंकी देव भक्त कार्यकारी मंडळ**

मु. पो. ता. संगमनेर, जि. अहमदनगर

# ध्यानधारणा

१ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! ध्यान म्हणजे काय? ईश्वरी स्वरुपात तल्लिन होणे ! ईश्वरी स्वरुपाची ओळख धरणे हे होय. योग, मुद्रासन व रिध्दी-सिध्दीने ध्यान धारणा सुधारत नाही व सुधारत नसते. ध्यान धारणा सुधारण्याकरीता परब्रह्म स्वरुपाकडेच वळावे लागते व वळावे.

२ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! ध्यानधारणा हा एक भक्तीचा प्रकार आहे. मनुष्याने जसे ध्यान लावून घ्यावे तसे ध्यान लागते व लागत जाते. ध्यानात ध्यान **ब्रह्मानंदी ध्यान** हे श्रेष्ठ होय. हे सद्‌गुरुकृपेशिवाय लागत नाही व लागत नसते. सद्‌गुरु हा ब्रह्म स्वरुपाची ओळख करुन देऊन मनुष्याला मुक्त बनवतो.

३ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! सर्व व्यापीपणा हा ध्यान धारणेचाच प्रकार आहे व असतो. ध्यानातच लक्षालक्ष कल्पना उद्‌भवते व उद्‌भवत असते. लक्षाचे अलक्ष व अलक्षाचे लक्ष हे ध्यानानेच बनते. ध्यानातच ज्ञानाचे विज्ञान व विज्ञानाचे ज्ञान बनते. मूळ ध्यान आहे तेच कायम रहाते.

४ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! गुहेत जाऊन तप करण्यापेक्षा जगरुपी परमेश्वराला मला ओळखा. माझे विराट रुप दर्शन हा समाजच आहे. मी ईश्वर समाजरुपानेच नटलेलो आहे. त्याचे ध्यान केल्याने म्हणजे सेवा केल्याने मी ईश्वर लौकर प्राप्त होतो व होईन. तसा इतर ध्यानाने लौकर प्राप्त होणार नाही व होत नसतो.

५ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! **स्वरुप ध्यान** हे मुक्त बनण्याकरिता आहे. हे सद्‌गुरुने लागते व कळते. जनसेवा ही कर्तव्य साधण्याकरता आहे. मी ईश्वर कर्तव्यात आहे. जनसेवा केल्याने अगदी जवळ येतो व भक्ता ठायी अधिष्ठान ठेवतो. जनसेवा केल्याने महात्मा ही पदवी अंगी येते व विश्वव्यापी प्रेम वाढते. वैजनाथ रुपे कलंकी अवतारे मी ध्यान धारणा दाखवित आहे. मूळ शोधा व ठाईच निवांत व्हा.

जनसेवा ही **विश्वरुप ध्यानच** आहे.

६ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! कुणाला पैशाचे ध्यान लागते. कुणाला बायकोचे ध्यान लागते. कुणाला जगाला लुबाडण्याचे ध्यान लागते. कुणाला चोरी करण्याचे ध्यान लागते. कुणाला पर पुरुषाचे ध्यान लागते. ध्यान हे लावून घ्यावे तसे आहे. कुणाला पर नारीचे ध्यान लागते. म्हणजे ध्यान अनेक प्रकारचे आहे. परंतु त्या नाशिवंत ध्याना पेक्षा परमेश्वराचे ध्यान आणि आपण तरुन जगाला तरविण्याचे ध्यान लावून घेणे बरे. स्त्री पुरुषांनी सत् सदाचरण नितीचा विचार केल्यावर नरजन्माचे खचितच योग्य चिज झाल्याशिवाय राहणार नाही.

७ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! मी ईश्वर कुणाला प्रपंच सोडा असे सांगतोय? मुळीच नाही. प्रपंचाचे ध्यान लागणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु आपला प्रपंच सुधारुन, जगाचा प्रपंच सुधारता आला पाहिजे व यावा. त्यातच खरे नरजन्माचे सार्थक आहे व होते. ज्याला जगाचा प्रपंच सुधारण्याची चिंता लागते असा महापुरुषच होय. सत्य, अहिंसा आणि प्रेम अशाच्या ठिकाणी कायमच असते. असा महात्मा पुरुष जगात विरळा !

८ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! हा माझा विश्वरुप संसार, माझा ईश्वराचाच आहे. हा प्रपंच नेटका चालविण्या करताच ईश्वराने पहिल्या प्रथम नरदेह निर्माण केला आहे. मी पहिल्या प्रथम ओंकार पुरुष नर देहात जन्माला आलो. तदनंतर लक्ष चौऱ्यांशी योनी निर्माण केल्या व योनी धर्माप्रमाणे अधिष्ठानाने घडामोड चालू ठेवली.

९ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! नर देहाच्या अवस्था चार ! बध्द, मुमुक्षु साधक आणि सिध्द. त्या चार अवस्थेत सात भूमिका नेमल्या व अवस्थेप्रमाणे व भूमिके प्रमाणे ध्यान धारणा लावून ठेवली व हा योनी धर्म चालविण्याकरीता शिवसाक्षी अधिष्ठान त्यावर ठेवले. मूळ माया ही जाणिव रुपाने व्यापक ठेवली. ही माझी ओंकार पुरुषाची ईच्छा होय.

१० तपस्वी लोक हो ध्यान धरा ! योग मुद्रासन वाले योगी हे ध्यानधारणा समाधी सर्व श्रेष्ठ समजतात. परंतु हे त्यांचे म्हणणे व समजूत चुकीची

आहे. आत्मा ब्रह्मांडात नेऊन ध्यानधारणा सुधारत नाही व मनुष्य मुक्त बनत नाही व मी ईश्वर प्राप्त होत नाही. मी ईश्वर कशाने प्राप्त होतो? तर भक्तीमार्गाने ! भक्तीत प्रेम हे ध्यान धारणा सुधारते व भाव समाधी लावते. **भावसमाधी** ही सर्व श्रेष्ठ आणि विश्व व्यापकता धरणारी आहे. हिचा महिमा मी ईश्वरच जाणतो. ही सद्गुरुत्वाच्या पूर्णतिनेच साधते. भावसमाधीची ध्यान धारणा ही परलोकातल्या आत्म्यासवे भाषण करु शकते. तसे योग समाधीच्या धारणेत साधत नाही. मी वैजनाथ कलंकी ईश्वर त्या ध्यान धारणेतच निमग्न आहे व असतो.

११ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! योग मुद्रासन धारणेत रिध्दी-सिध्दी साधतिल आणि सृष्टीपुरता मनुष्य प्राणी गमन करु शकेल. परंतु अनादी ब्रह्मसूत्र हाती धरु शकणार नाही. ध्यानधारणा ही भाव समाधीचीच सर्वश्रेष्ठ आहे व असते. सद्गुरुत्वाच्या पूर्णतेत ही ध्यान धारणा साधू शकते व साधते. हा आत्मा सर्व व्यापी बनू शकतो.

१२ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! योग समाधीची ध्यानधारणा ही जाणिवेच्या अलिकडची आहे. हे सर्व जडत्वातले म्हणजे वायूरुप खेळ आहेत. भावसमाधीची ध्यानधारणा ही जडत्वाच्या पलिकडची स्थिती आहे. हा आत्मा सर्वांची जाणिव बनतो व बनू शकतो व परलोकातल्या आत्म्यांसवे स्पष्ट बोलू शकतो व बोलतो.

१३ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! सहावी भूमिका ओलांडल्यानंतर परमस्थितीत हा आत्मा येतो. म्हणजे जाणिवेच्या पलिकडील हा स्थिती पहातो. म्हणजे परमानंद भोगतो. परमानंदावस्थेत जाणिव-नेणिव मी-तू भासाभास उरत नाही. कर्तृमाकर्तुम शक्ती भंगत नाही. ही कायम टिकते.

१४ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! योग, मुद्रासनवाल्यांना अदृष्य होता येत नाही व ब्रह्मसूत्र हे हाती धरु शकत नाहीत. भावसमाधीची ध्यान धारणा ही अंतर्ज्ञान्याठाईच असते. अंतर्ज्ञान्याशिवाय ब्रह्मसूत्र हाती धरता येत नाही व कुणी धरु ही शकत नाही. अंतर्ज्ञान हे सद्गुरुत्वाच्या पूर्णतेत आल्याशिवाय होत नाही व होत नसते.

१५ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! मनुष्य शोधाने जरी अदृष्य होऊ शकला तरी हा सृष्टी ओलांडून जाऊ शकत नाही. मेस्मेरिझम प्रयोगाने जरी

एखाद्याच्या मनातल्या गोष्टी ओळखू शकाल तरी अंतर्ज्ञानी बनू शकत नाही. अंतर्ज्ञानी सद्‌गुरु हा वेगळाच असतो. याची कर्तृमाकर्तुम शक्ती दडत नाही व दडत नसते. ज्या ठिकाणी कर्तृमाकर्तुम शक्ती प्रगट आहे. हा महिमा वेगळाच असतो.

१६ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! अंतर्ज्ञान म्हणजे तोंडच्या गोष्टी नव्हे. हे प्राप्त होण्याला सद्‌गुरुचीच कृपा व्हावी लागते. मनुष्य जेव्हा सद्‌गुरुत्वाच्या पूर्णतेत येईल तेव्हाच त्याला अंतर्ज्ञान होईल व ही ध्यानधारणा सर्व विश्वव्यापक बनू शखेल. विश्वव्यापकता ही पूर्णत्वाशिवाय साधत नाही व साधणार नाही.

१७ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! मी ईश्वर जेव्हा स्मरणातीत होतो, तेव्हा काहीच नव्हते. माझी ध्यान धारणा तेव्हा ठाईच स्थिरावली होती. जेव्हा सहज स्थितीने जाणिव ईच्छा निर्माण झाली तेव्हा ध्यानधारणा सुरु झाली. ध्यानधारणेपासून अनादी ब्रह्मसूत्र निर्माण झाले व जीवा शिवाच्या प्रेरणेने अभासाचा विश्वभास झाला. विश्वभासात मूळ मायेचे अधिष्ठान व्यापले.

१८ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! मनुष्य हा कितीही जरी पुढे गेला, तरी अक्षराच्या पुढे जाऊ शकत नाही. अक्षर हे जाणिव स्थितीत आहे. जाणिव लोपल्यानंतर ब्रह्मनाद खुंटतो. मग एकलीच निरामय सत्य सद्‌वस्तू उरते. सत्य सद्‌वस्तूच्या पुढे दूसरी स्थिती नाही. मी ईश्वर येथे निद्राभान स्थितीत युगेच्या युगे असतो. स्फुरण पावल्यानंतर भान जागृत होते.

१९ तपस्वी लोक हो ध्यान धरा ! ध्यानधारणा म्हणजे काय? विश्व व्यापकता व चित् चैतन्याची एकाग्रता हे होय. ध्यानधारणेशिवाय अनादी ब्रह्मसूत्र चालविता येत नाही व येत नसते. ध्यानधारणेचे महत्व सर्व धारणेपेक्षा विशेष असते. सर्व धारणा लोपतिल. परंतु ध्यानधारणा ही लोपणार नाही व लोपत नसते.

२० तपस्वी लोक हो ध्यान धरा ! मी ईश्वर नेहमी ध्यान धारणेत आहे व असतो. ध्यान धारणेशिवाय जागृती रहात नाही व रहात नसते. युग महायुग, मन्वंतरे, काळ, वेळ, अवकाश, प्रलय व महाप्रलय हे ध्यान